N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** भुईंज **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0299 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/12/2022 06:04 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 30/11/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/11/2022
   **Time From (वेळेपासून):** 14:12 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:12 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/12/2022 **Time (वेळ):** 04:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/12/2022 05:40 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 8 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आनेवाडी टोलनाका , येथील तक्रारदार यांचे हटेल,महाराजा येथे ता वाई

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्रीमती नुरजहाँ अस्लम शेख

**(b) Husband's Name (पती चे नाव) :** अस्लम शेख

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 462,भिमाबाई आंबेडकर,नगर, सदरबझार सातारा ता जि सातारा ,सातारा शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 462,भिमाबाई आंबेडकर,नगर, सदरबझार सातारा ता जि सातारा ,सातारा शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-7722056551**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निवास शंकर मोरे पोलीस उपनिरीक्षक भुईज पोलीस स्टेशन | | वडील का नाम : शंकर मोरे | 1. भुईज पोलीस स्टेशन,,भुईंज,सातारा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | संजय प्रभु माटे | | वडील का नाम : प्रभु माटे | 1. पिराचीवाडी, आसले, तावाई , जिसातारा,भुईंज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारले रक्कम25,000/ रुपये | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 25,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, श्रीमती नुरजहाँ अस्लम शेख, वय-43 वर्षे, व्यवसाय- हटेल, हटेल महाराजा आनेवाडी टोलनाका, सातारा.रा. 462,भिमाबाई आंबेडकर, नगर सदरबझार सातारा ता.जि.सातारा मोबाईल नंबर -7722056551. समक्ष भुईज पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देते की, मी वरील ठिकाणी राहणेस असुन आनेवाडी टोलनाका येथे माझा हटेल व्यवसाय आहे. सदरचा हटेलचा व्यवसाय मी माझी मुलगी सानिया व मुलगा आश्रफ असे गेले सात वर्षापासुन हटेल व्यवसाय करतो. मला लिहिता व वाचता येत नाही परंतु सही करता येते. तसेच मला मराठी व हिंदी बोलता येते व समजते. दिनांक 26/11/2022 रोजी रात्री 11/00 वाजण्याच्या सुमारास आमचे हटेल महाराजा येथे जेवणासाठी दोन कस्टमर आले होते. त्यांचे जेवण करुन झालेनंतर बिलासाठी त्यांचेमध्ये व माझा मुलगा आश्रफ यांचेमध्ये वादावादी सुरु झाली. त्यातुन त्यांचेत मारामारी चालु झाली. त्यावेळी त्यांच्यातील एकाला डोक्यावर मार लागला. त्यानंतर त्यांनी दिनांक 27/11/2022 रोजी माझ्या मुलाचे विरुध्द भुईज पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला. त्यानंतर माझ्या मुलाला पोलीसांनी अटक केली. त्याची दिनांक 01/12/2022 रोजीपर्यंत पोलीस कोठडी घेतली. त्यानतर त्याच दिवशी भुईज पोलीस स्टेशनचे बिट अंमलदार भोसले हे आमचे हटेलवर आले व त्यांनी मला तुम्हाला तपासकामी भुईज पोलीस स्टेशनला मोरे साहेब यांनी बोलाविले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व माझी मुलगी पोलीस स्टेशनला गेलो. त्यावेळी माझी मुलगी सानिया हिने दिले तक्रारीवरुन त्या दोघांविरुदध एन सी दाखल केली. त्यानंतर दिनांक 28/11/2022 रोजी भुईज पोलीस स्टेशनचे मोरे साहेब यांचा मला फोन आला व त्यांनी मला, पोलीस स्टेशनला या असे सांगितले. त्यानंतर मी व माझी मुलगी असे पोलीस स्टेशनला गेलो तेथे मोरे साहेबांनी तुम्हाला वरील गुन्हयात आरोपी करणार आहे असे सांगितले. त्यावेळी त्यांनी माझा जबाब घेवुन मला, माटे तुम्हाला भेटल त्याप्रमाणे करा असे सांगितले त्यांनतर मी घरी जात असताना भुईंज पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी माझ्या हटेलवर पंचनामा करण्यासाठी आले होते त्यावेळी त्यांचे सोबत फोटोग्राफर माटे आले होते ते मला भुईज पोलीस स्टेशनचे बाहेर माटे भेटले मी त्यांना ओळखते. त्यावेळी त्यांनी

मला, तुमच्या मुलाचे विरुद्ध दाखल गुन्हयामध्ये तुम्हाला आरोपी करायचे नसेल आणि गुन्हयात मदत करण्यासाठी व जामीन देण्यासाठी तुम्हाला दोन लाख रुपये द्यावे लागतील असे मोरे साहेबांनी सांगितले आहे. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणाले.भुईंज पोलीस स्टेशनचे मोरे साहेब यांनी मला पैसे मागीतले असुन ते पैसे माटे यांचेकडे देण्यासा सांगितले असुन मला त्यांना पैसे देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयात तक्रार देण्यासाठी दिनांक 29/11/2022 रोजी गेले. त्याठिकाणी पो.नि. पवार साहेब यांना माझी सर्व लाच मागणीची तक्रार सांगितली. मला लिहता व वाचता येत नसल्याने पोलीस निरीक्षक विक्रम पवार यांचे सुचनेनुसार माझी तक्रार मी सांगितल्याप्रमाणे पो.ना.ताटे यांनी संगणकावर टंकलिखीत केली. त्याची प्रिन्ट काढल्यानंतर पोनि पवार यांनी मला ती वाचून दाखविली. ती बरोबर असल्याची माझी खात्री झाल्यावर मी तक्रारी अर्जावर सही करुन अंगठयाचा शिक्का दिला. त्यांनतर पो.नि. पवार यांनी दोन पंच बोलावुन घेतले त्यातील श्रीमती, उषा अरुण दाभाडे, वरीष्ठ सहायक, जि.प.सातारा व श्री. सुहास शंकर बोले, कनिष्ठ लिपीक, एम.एस.ई.बी. सातारा या दोन पंचाशी माझी ओळख करून दिली. त्यावेळी मी, पो.नि. पवार यांचे सुचनेनुसार वरील पंचासमक्ष माझी तक्रार सांगिती व त्यानंतर पो.नि. पवार साहेब यांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचांना वाचण्यास दिला वत्यानंतर त्यावर पो.नि.पवार व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पो.नि. पवार यांचे सुचनेनुसार मी माझ्याकडे असलेले क्सीस मोपेड वरुन भुईज गावचे अलीकडे रस्त्याचे कडेला गेले. त्याठिकाणी पो.नि. पवार, दोन पंच व स्टाफ असे खाजगी वाहनाने माझ्या आधी पोहचले.त्यानंतर पो.नि. पवार यांनी आपलेकडील व्हाईस रेकर्डर दाखवुन तो कसा चालु बंद होतो याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन एक नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यामध्ये कोणतेही संभाषणाची फाईल सेव्ह नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर मला व पंच दाभाडे यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डर माझ्याकडे देवुन रवाना केले. मी व पंच दाभाडे भुईंज चौकात गेले. तेथे जावुन मी माझ्या फोनवरुन माटे यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी सांगितलेप्रमाणे माझी व माटे यांची भुईंज चौकामध्ये भेट झाली. त्यावेळी माटे व माझ्यामध्ये, माझा मुलाच्या विरुध्द दाखल गुन्हयामध्ये मला अटक न करणेसंबंधाने चर्चा झाले. त्यावेळी माटे यांनी मला त्यांचे मोबाईलवर पीएसआय मोरे साहेब यांचे रेकर्डींग ऐकविले. त्या रेकर्डीगमध्ये मोरे साहेबांनी भाभी कडन पंचविस हजर घ्यायाचेत असे बोलणे केले असल्याचे मी ऐकले. त्यानंतर माटे यांनी, साहेबांनी पंचवीस सांगितलेत माझ्यापाशी पोहचल, भाभी तुमचा काय विषय येणार नाही असे म्हणुन मोरे साहेबांचे वतीन माझ्याकडे 25,000/- रुपयांची लाच मागणी केली. त्यानंतर माटे यांनी त्यांचे मोबाईलवरुन मोरे साहेबांना फोन लावुन मला बोलण्यास दिले. त्यावेळी मोरे साहेबांनी, तुम्ही या की, मिती पंचवीस सांगितले होते ना तुम्हाला, हा दया तुम्ही माटेकडे, उद्या माझी येवुन गाठ घ्या, या उद्या, मला फोन करुन या मी भेटतो तुमच्याशी भेटतो असे म्हणाले. त्यानंतर मी तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी आले त्यावेळी पो.नि. पवार यांनी महिला पोलीस सपकाळ यांचेकरवी व्हाईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केला. पो.नि. पवार यांनी पंच दाभाडे हकिकत विचारली ती त्यांनी वरीलप्रमाणे सांगितली. त्यानंतर पो.नि. पवार यांनी मला हकिकत विचारली तेव्हा मी वरील प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पो.नि. पवार यांनी व्हाईस रेकर्डरमधील संभाषणाची फाईल सेव्ह करुन त्यातील संभाषण ऐकले.एकंदरीत केले पडताळणी कारवाईमध्ये खाजगी इसम माटे व माझी भुईंज चौक येथे समक्ष भेट झाली त्यावेळी माटे यांनी त्यांचे मोबाईलवर मोरे साहेब व माटे यांचे सेव्ह असलेले संभाषण ऐकवुन लाच रक्कम माटे यांचेकडे देण्याची खात्री करुन दिली. तसेच माझे मुलाविरुद्ध दाखल असले गुन्ह्यामध्ये आरोपी न करण्यासाठी व मुलास गुन्ह्यात मदत करण्यासाठी खाजगी इसम माटे याने मोरे साहेबांच्या वतीने माझ्याकडे तडजोडीअंती 25,000/- रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच आणुन देण्यास सांगितल्याची पो.नि. पवार व दोन्ही पंचाची खात्री झाली. कारवाईवेळी मोरे साहेब यांचेशी फोनवर झालेल्या बोलण्यात त्यांनी मला, उदया भेटण्यास बोलविले असल्याने पो.नि.पवार यांनी दिनांक 30/11/2022 रोजी मोरे साहेबांची समक्ष भेट घेण्यास पाठवुन त्यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर पो.नि.पवार यांनी मला दिनांक 30/11/2022 रोजी सकाळी 10.45 वा. भुईंज गावाच्या अलीकडे रस्त्याचे कडेला हजर राहण्याची सुचना देवुन मला घरी जाणेस सांगितले. त्यानंतर दिनांक 30/11/2022 रोजी मी माझेकडील मोपेड क्सीसवरुन भुईंज गावचे अलीकडे येवुन थांबुन राहीले. साधारण 10.45 वाजणेचे सुमारास पो.नि.पवार, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनातुन मी थांबलो त्याठिकाणी आले. त्यानंतर पो.नि.पवार यांनी भुईंज पोलीस स्टेशनचे पीएसआय मोरे यांची पडताळणी करण्याचे ठरवुन त्यांचेकडील व्हाईस रेकर्डर दाखवुन तो कसा चालु बंद होतो याचे प्रात्यक्षीक करुन दाखवुन एक नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यामध्ये कोणतेही संभाषणाची फाईल सेव्ह नसल्याची खात्री करुन दिली.त्यानंतर मला व पंच दाभाडे यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह रवाना केले त्यावेळी मी भुईंज पोलीस स्टेशन येथे जावुन पीएसआय मोरे यांची भेट घेतली. आमचेमध्ये चर्चा सुरू असताना त्याठिकाणी माटे अचानकपणे आले त्यावेळी पीएसआय मोरे यांनी माझ्या मुलाचे विरुध्द दाखल गुन्हयामध्ये मला अटक न करणेसाठी तडजोडीअंती 25000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम माटे यांचेशी संपर्क साधुन माटे यांचेकडे देण्यास सांगितली असुन त्यावेळी माटे यांनी ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी तेथुन निघुन आपण थांबले ठिकाणी आले. त्यावेळी पो.नि. पवार यांनी पो.क. सपकाळ यांचेकरवी व्हाईस रेकर्डर काढुन घेतला. त्यानंतर पो.नि. पवार यांनी पंच दाभाडे यांना हकिकत विचारली ती त्यांनी वरीलप्रमाणे सांगितली त्यानंतर पो.नि. पवार यांनी मला हकिकत विचारली ती मी सांगितली. त्यानंतर पो.नि. पवार यांनी व्हाईस रेकर्डरमधील संभाषणाची फाईल सेव्ह करुन त्यातील संभाषण ऐकले.एकंदरीत केले पडताळणी कारवाईमध्ये मोरे साहेब, माटे खाजगी इसम व माझी अशी समक्ष भुईंज पोलीस स्टेशनला भेट झाली. त्यावेळी माझेत व मोरे साहेब यांचेमध्ये मला अटक न करणेबाबत व गुन्हयात मदत करणेबाबत चर्चा झाली. त्यावेळी माझे मुलाविरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये आरोपी न करण्याकरिता व मुलास गुन्हयात मदत करण्यासाठी मोरे साहेब यांनी माझ्याकडे 25,000/- रूपयांची लाच मागणी करून ती लाच रक्कम लागलीच माटे यांचेशी संपर्क साधुन त्यांना देण्यास सांगितल्याची व माटे यांनी लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याची पो.नि.पवार व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर पो.नि. पवार यांनी सापळा कारवाई करण्याचे ठरवुन त्यांचे सुचनेनुसार मी माझ्या व्यवसायाचे शिलेकेतील 25,000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवले. त्यानंतर पो.नि. पवार यांनी त्यांचेकडील अंथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायोलेटचा दिवा दाखवुन त्यांचे गुणधर्म व उपयोग समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. पवार यांनी लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनामध्ये केली. सापळा कारवाई संबंधाने पो.नि. पवार साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी, पो.नि. पवार साहेब यांचे सुचनेप्रमाणे संजय माटे यांना फोन केला असता ते माझ्या हटेलवर येणार असल्याने पो.नि. पवार यांनी माझे हटेलवर जाण्याचे ठरविले. तसेच सापळा कारवाई हटेल महाराजाचे येथे करण्याचे ठरवुन मला माझे मोपेड वाहनावरुन व पो.नि. पवार असे सर्वजण त्यांचे खाजगी वाहनाने माझे आनेवाडी टोलनाका येथील हटेल महाराजचे जवळ येवुन वाहन थांबविले. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच दाभाडे यांना माझ्या सोबत माझ्याकडील मोपेडवरुन खाजगी इसम माटे यांची भेट घेण्याकामी माझे हटेल महाराज येथे रवाना केले. पवार साहेब व सापळा पथक आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन खाजगी वाहनातुन उतरुन हटेल महाराजाचे आसपास थांबुन राहीले. मी व पंच दाभाडे असे पो.नि. पवार यांचे सुचनेप्रमाणे हॉटेल महाराज येथे खाजगी इसम माटे यांची वाट पाहात बसले बराच वेळ झाला तरी माटे हा हॉटेल महाराजा येथे आले नाहीत म्हणुन मी माझे मोबाईलवरुन माटे यांना मोबाईलचा लॉऊडस्पीकर ऑन करुन फोन लावला. त्यावेळी त्यांनी दहा मिनिटात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने माटे यांचा फोन आला. त्यावेळी त्यांनी सर्व्हिस रोडवर येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना "नाय मला दवाखान्यात जायचे आहे तुम्हीच या लवकर हॉटेलमध्ये" असे सांगितले. त्यानंतर काही वेळानंतर माटे हे आमचे हॉटेल महाराजा मध्ये आले व "मामा कुठ गेले" असे

म्हणत माझ्याकडे बघत त्यांचे उजव्या हाताचा अंगठा तर्जनिवर घासुन लाच मागणीचा इशारा केला. त्यावेळी मी माझ्याकडील पर्समधील 25,000/- रुपये लाच रक्कम काढुन माटे यांचे समोर धरत "मामा काय माहिती कुठ गेले..सानिया..मामा नाय तिकड कुठ गेल काय माहिती धरा जाऊ दे चला पटकन मला जायचं दवाखान्यात..घ्या" असे म्हणाले. त्यानंतर माझे हातातील लाच रक्कम माटे यांनी उजव्या हाताने घेवुन "हे मोजलेत ना" असे म्हणाले. त्यावर मी, "तुम्ही घ्या ना मोजुन..मी मोजलेले वेगळे पडतय तुमी मोजलेले वेगळ पडतय..परत कमी एखादी नोट म्हणे साहेब म्हणतील तु घेतल काय" असे म्हणाले. त्यानंतर माटे यांनी त्यांचा फोन मला दिला व मी त्यांचे फोनवरुन मोरे साहेब यांना फोन केला. त्यावर माटे यांनी "झालय म्हणल व्यवस्थीत" असे म्हणुन कॉल कट झाला. त्यानंतर माटे यांनी पुन्हा मोरे साहेब यांना कॉल केला त्यावेळी माटे यांनी "बर..भाभींनी केलेय काम" असे म्हणाले. त्यानंतर माटे यांनी मला बोलण्यास दिले त्यावर मोरे साहेब "हां.बोला" असे म्हणाले. त्यावर मी, "हा ती दिलेत बगा ती पंचवीस हजार सांगितलेत त्यांना दिलेत त्यांनी मोजुन पण घेतलेत पंचवीस हजार रुपये" असे म्हणाले. त्यावर मोरे साहेब यांनी "असुदे असु दया" असे म्हणुन फोन बंद केला. त्यांनतर मी माटे यांचे तेथुन बाजुला येवुन लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच पो.नि.पवार साहेब, पंच श्री.बोले व सापळा पथक असे माझ्याजवळ आले. त्यानंतर पवार साहेब यांचे सुचनेनुसार महिला पोलीस सपकाळ मॅडम यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यानंतर पवार साहेब व पथक असे पंच नं. 1 यांचेकडे गेले. त्यानंतर पवार साहेब यांनी हॉटेल महाराजा येथे पथकाच्या सहाय्याने माटे यांच्या तपासण्या केल्या.

मला पवार साहेबांनी हॉटेल महाराजा येथे बोलवुन माझी पंच दाभाडे यांचेकरवी माझी देखील अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्याकडील पर्सचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पवार साहेब यांनी मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे जावुन थांबण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझे मोपेडवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालय येथे आले. त्यानंतर काहीवेळाने माटे व पोलीस उपनिरीक्षक मोरे साहेब यांना घेवून स्टाफ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयात आले. त्याठिकाणी श्री. पवार साहेब यांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मला कार्यालयात बोलावुन घेवुन महिला पंच यांचेकरवी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पवार साहेबांनी, माझे व पंच दाभाडे यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाची स्क्रिप्ट तयार केली व त्यामध्ये नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला त्यांचे कक्षामध्ये बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली. ती मी वरीलप्रमाणे कथन केली. सदरबाबत सविस्तर यशस्वी पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा येथे टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे.

तरी सापळा कारवाईमध्ये लोकसेवक निवास शंकर मोरे, वय 55 वर्षे, पोलीस उपनिरीक्षक, भुईज पोलीस स्टेशन, पोलीस खाते, रा. प्लॉट नं 25, यादव कॉलनी, तामजाईनगर सातारा व खाजगी इसम संजय प्रभु माटे,वय-46 वर्षे, रा.पिराचीवाडी, आसले, ता.वाई जि.सातारा यांनी दिनांक 29/11/2022 व दिनांक 30/11/2022 रोजी पडताळणी कारवाईवेळी माझा मुलगा आश्रफ याचेविरुध्द भुईज पोलीस स्टेशनला दाखल असले गुन्हयामध्ये मला अटक न करण्यासाठी व मुलास गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी माझ्याकडे तडजोडीअंती 25,000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम लोकसेवक मोरे यांनी सांगितलेप्रमाणे दिनांक 30/11/2022 रोजी सापळा कारवाई दरम्यान 25,000/- रुपये लाच रक्कम खाजगी इसम संजय प्रभु माटे यांनी आनेवाडी टोलनाका येथील माझे हॉटेल महाराजा येथे 14.12 वाजण्याचे सुमारास स्विकारली आहे. म्हणून माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझा वरील संगणकावर टंकलिखित केलेला जबाब मला ए.के.बरकडे पो ना 1185बरकडे ठाणे अंमलदार भुईंज पोलीस ठाणे यांनी मला वाचुन दाखविला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखित केलेला आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): ASHISH DILIP KAMBALE(I (Inspector)) / DGPADKM8407 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** ASHISH DILIP KAMBALE

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** DGPADKM8407

-PN 1181-

पोलीस स्टेशन ऑफीसर
भुईज पोलीस स्टेशन